# Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded- 431606 (MH)

## Dr. Babasaheb Ambedkar Chair & Studies Centre

**INTERNATIONAL SEMINAR**

(आंतरराष्ट्रीय चर्चासत्र)

**DALIT LITERATURE: A GLOBAL PERSPECTIVE**

**(दलित साहित्य: जागतिक परिप्रेक्ष्य)**

**22 March, 2025**

---

- **विद्यापीठ :** 17 सप्टेंबर 1994 रोजी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाची स्थापना झाली. हैदराबाद मुक्तिसंग्रामाचे नेते स्वामी रामानंद तीर्थ यांचे नाव या विद्यापीठाला देण्यात आले आहे. ज्ञान, कौशल्य, संशोधन व स्पर्धेत टिकण्यासाठी आवश्यक घटकांचा स्वीकार करुन प्रगती करण्याचा हा काळ आहे. काळाची पावले ओळखून नांदेड, लातूर, हिंगोली व परभणी या जिल्ह्यांमध्ये शिक्षणप्रसाराचे कार्य विद्यापीठ निष्ठेने करीत आहे. गोदातीराजवळ साडेपाचशे एकरात पसरलेल्या निसर्गसंपन्न विद्यापीठात अनेक अभिनव व विकासाभिमुख उपक्रम सुरू करण्यात आले आहेत. कार्यक्षेत्रातील चार जिल्ह्यांमधील सुमारे चारशेहून अधिक संलग्नित महाविद्यालयांच्या माध्यमातून मराठवाड्याच्या सर्वंकष विकासात विद्यापीठाचा महत्त्वपूर्ण वाटा आहे.

- **अभ्यास केंद्र:** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात 2009 साली डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन व अभ्यास केंद्राची स्थापना करण्यात आली. समताधिष्ठित, शोषणमुक्त, बंधुता व भगिनीभावावर आधारलेला धर्मनिरपेक्ष असा लोकशाही समाज निर्माण करणे, हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जीवनध्येय होते. अशा समाजाच्या उभारणीसाठी आवश्यक अशा ज्ञानमीमांसेची कास धरावी, या हेतूने या केंद्राची स्थापना करण्यात आलेली आहे. डॉ. आंबेडकरांनी ज्ञानाच्या क्षेत्रात नवी आव्हाने पेलली. शिक्षण हे समाजप्रबोधनाचे साधन व्हावे, या भूमिकेला अनुलक्षून हे अभ्यास केंद्र ज्ञानाच्या क्षेत्रात हस्तक्षेप करण्याची आणि समाजोपयोगी व मुक्तीदायी ज्ञानाची कास धरण्याची भूमिका घेते. जातिव्यवस्थेविरोधात चळवळ उभी करताना म. फुले आणि डॉ. आंबेडकरांनी नव्या ज्ञानाचे सृजन केले. नव्या समताधिष्ठित समाजाच्या निर्मितीसाठी धर्मशास्त्र, राज्यशास्त्र, समाजशास्त्र, तत्त्वज्ञान, शिक्षणशास्त्र, अर्थशास्त्र इ. विद्याशाखांमध्ये पुनर्मांडणीची भूमिका घेतली. ज्ञाननिर्मितीची

प्रक्रिया त्यांनी व्यस्त जीवनातही अव्याहतपणे सुरू ठेवली. त्यांनी निर्मिलेले ग्रंथभांडार आणि विकसित केलेली ज्ञानमीमांसा व अभ्यासपद्धती ही गेल्या दशकांमधील सामाजिक- सांस्कृतिक चळवळींचे प्रेरणास्त्रोत राहिलेली आहे. स्वातंत्र्योत्तर काळात गरिबी, जातीयता, स्त्री-पुरुष विषमता, धर्मांधता असे अनेक प्रश्न उत्तरोत्तर तीव्र रूप धारण करीत आहेत. या सर्व प्रश्नांविषयी चर्चा घडवून आणणे, तसेच विविध प्रकारचे समाजहितैषी अभ्यासप्रकल्प हाती घेणे, हे या केंद्राचे उद्दिष्ट आहे. 'Interdisciplinary Certificate course in Phule- Ambedkar Studies' हा प्रमाणपत्र अभ्यासक्रम अध्यासन केंद्रात सुरु आहे. देश- विदेशातील महत्त्वाच्या अभ्यासक आणि संशोधकांच्या व्याख्यानांचे आयोजन अध्यासन केंद्रात करण्यात आले असून केंद्राचे स्वतंत्र ग्रंथालय आहे.

## ➢ Dalit Literature:

A significant literary movement in modern Indian literature, Dalit literature emerged in the post-independence era through both social and literary introspection. This term gained prominence, particularly after the 1960s. The word Dalit originates from the country's social structure. The varna and ashrama systems declared a large section of society as untouchable for various traditional reasons, making even a simple human life impossible for them. They were excluded from knowledge, power, wealth, culture, and all forms of social resources. Therefore, Dalit literature firmly rejected religiously sanctioned traditions. It emerged as a powerful outcry for liberation from intellectual and psychological enslavement.

A need arose to examine the chaturvarnya system, which denied human rights, the religious constraints that upheld it, and the concept of God that justified human subjugation—all from a scientific, natural, and humanistic perspective. Literature must always be connected to life, resonating with its deepest emotions and values, even if they cannot always be fully expressed in words. This conviction and commitment formed the foundation of Dalit literature.

Although Dalits and non-Dalits are part of the same society, their realities are fundamentally different. Recognizing this, in 1956, Dr. B. R. Ambedkar took the decisive step of religious conversion. This was a direct blow to the ideological enslavement of non-Dalits. However, his passing soon after dealt a severe blow to the Dalit community as well. It was through this dual impact that Dalit literature rose with new vigor. The collective consciousness of the rejected found its strength in the form of Dr. Ambedkar.

In this background, the objective of this International seminar is to initiate a comprehensive discussion and analysis of Indian Dalit Literature with a global perspective.

## ➢ शोधनिबंधाचे विषय / Topics for Research Paper:

1. **जागतिक परिप्रेक्ष्यात दलित साहित्य**
   Dalit Literature in the Global Perspective
2. **भारतीय दलित साहित्य आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे तत्त्वज्ञान**
   Indian Dalit Literature and Philosophy of Dr. Babasaheb Ambedkar
3. **दलित साहित्यातील वैश्विकता**
   The Universality in Dalit Literature
4. **दलित साहित्य : आत्मसन्मानाचा व्यापक लढा**
   Dalit Literature: A Plight for Self -esteem
5. **इंग्रजी आणि विविध भारतीय भाषेतील दलित साहित्य (उदा. मराठी, हिंदी, तेलगू, पंजाबी, कन्नड, गुजराती इत्यादी)**
   Dalit Literature in English and in Indian Languages (e. g. Marathi, Hindi, Telugu, Panjabi, Kannada, Gujarati etc.)
6. **भारतीय दलित कविता**
   Indian Dalit Poetry
7. **भारतीय दलित आत्मकथने**
   Indian Dalit Autobiography
8. **भारतीय दलित रंगभूमी**
   Indian Dalit Theatre
9. **दलित साहित्याचे सौंदर्यशास्त्र**
   The Aesthetics of Dalit Literature
10. **दलित साहित्याची सांस्कृतिक पार्श्वभूमी**
    Cultural Background of Dalit Literature
11. **डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि वाड्मयीन मूल्यजाणिवा**
    Dr. Babasaheb Ambedkar and Literary Value Consciousness
12. **सांस्कृतिक मूल्ये आणि दलित साहित्य**
    Cultural Values and Dalit Literature
13. **मराठी दलित साहित्य : संकल्पना आणि स्वरूप**
    Marathi Dalit Literature: Concept and Nature
14. **भारतीय दलित साहित्य आणि सामाजिक परिवर्तन**
    Indian Dalit Literature and Social Transformation

## ➢ महत्त्वाची सूचना:

प्राध्यापक, विद्यार्थी आणि संशोधक या आंतरराष्ट्रीय चर्चासत्रात सहभागी होवू शकतात. वरील विषयांच्या अनुषंगाने drbabasahebambedkarchair@gmail.com या ई-मेलवर दि. 5 मार्च 2025 पर्यंत शोधनिबंध पाठवावेत. **शोधनिबंध प्रकाशित केले जाणार नाहीत.** निवड समितीने मान्यता दिलेल्या शोधनिबंधाचे वाचन किंवा सादरीकरण यासाठी आपल्याला निमंत्रित केले जाईल. **चर्चासत्रास प्रत्यक्ष उपस्थित असलेल्या अभ्यासकांनाच प्रमाणपत्र दिले जाईल.** *केवळ चर्चासत्राचे शुल्क भरले किंवा पेपर पाठवला म्हणून प्रमाणपत्र दिले जाणार नाही.* (चर्चासत्र शुल्क प्राध्यापक रु. 1000/-, विद्यार्थी रु. 600/- एवढे आहे. बँक डिटेल्ससाठी संपर्क करावा.) रीतसर नोंदणी केलेल्यांना चर्चासत्र किट, दुपारचे भोजन, चहा आदी व्यवस्था असेल. ज्यांना निवासव्यवस्था पाहिजे असेल त्यांनी आधी कळवले तर सशुल्क व्यवस्था करता येईल. अधिक माहितीसाठी **श्री. संदीप एडके (मो. 8888756626)** यांच्याशी संपर्क करावा.

*(शोधनिबंध शब्दमर्यादा: 1500 ते 3000 शब्द. मराठी/ हिंदी शोधनिबंध युनिकोडमध्ये (कोकिळा फॉन्ट) टाइप करून पाठवावेत. इंग्रजीसाठी Times New Roman फॉन्ट वापरावा.)*

**या चर्चासत्रासाठी देश- विदेशातील महत्त्वाच्या अभ्यासकांना निमंत्रित करण्यात आले आहे. हे चर्चासत्र विद्यापीठाच्या सिनेट हॉलमध्ये होईल. आपण सर्वांनी सहभागी व्हावे, ही विनंती.**

संचालक,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन व अभ्यास केंद्र